# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☏ / फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web.ropune.org.in

अत्यंत महत्वाचे/
जा.क्र.विकापु/विवि/सीईटी प्रवेश परिक्षा/२०११-१२/ 4662 दिनांक : 14 JUL 2011

प्रति,

प्राचार्य,
शासकीय / शासकीय अनुदानित / विना अनुदानित
पदवी / अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र संस्था

विषय : प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र पदवी अभ्यासकमांच्या माहितीच्या सादरीकरणांबाबत

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०११.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/विवि/पदवी-२०११-१२/५११४ दिनांक २०/०६/२०११
३) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०११/३२६२ दिनांक ११/०७/२०११

. उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व शासकीय /शासकीय अनुदानित आणि विना अनुदानित पदवी अभियात्रिकी आणि औषधनिर्माण शास्त्र संस्थाना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र पदवी अभ्यासकमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची माहिती सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी व पालक यांना होणे गरजेचे असल्याने, संस्थेमध्ये माहितीसत्र आयोजित करु ईच्छित आहेत, अशा संस्थांनी या कार्यालयातील श्री एस बी शिन्दे, प्रोग्रॅमर यांच्याशी संपर्क साधून, वरील अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची माहिती देणारे पॉवर पॉइंट प्रेझेटेशनची प्रत उपलब्ध करुन ध्यावी. व जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांपर्यत प्रवेशाबाबतची माहिती पोहोचण्याच्या दृष्टीने संस्थास्थरावर प्रयत्न करावेत. असे वरील संदर्भ क्र १ अन्वये सर्व संस्थांना सूचित करण्यात आले होते. **ज्या संस्थांनी सदरचे माहितीसत्र आयोजित केले आहे, अशा संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी खालील तक्त्यात माहिती त्वरीत सादर करावी. सदरची माहिती शासनास सादर करावयाची असल्याने प्रथम प्राध्यान्य देण्यात यावे.**

| संस्थेचे नांव | माहिती सत्र आयोजित केल्याचा दिनांक | माहिती सत्र आयोजित केल्याचे ठिकाण | माहिती सत्र उपस्थितांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| | | | |

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे